## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६९६ माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/१०/२०१६

**१) महाविद्यालयाचे प्राचार्य व अधिक्षक यांनी बनावटी दस्ताऐवज तयार करुन संस्थेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :-**

सन २०१४ एफील ते सन २०१५ मार्च पर्यत. यातील आरोपी क्र. १ हे समर्थ महा. विद्यालय लाखनीचे प्राचार्य असुन व आरोपी क्र. ०२ हे अधिक्षक या पदावर कार्यरत आहेत यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन महाविद्यालयाचे बनावटी दस्ताऐवज तयार केला व तो दस्ताऐवज खरे आहे म्हणुन महाविद्यालयीन कामात वापर करुन शासकीय व संस्थेची जवळपास २५,००,०००/-रु. ची अफरातफर केली व शासनाचे संस्थेची फसवणुक केली असे फिर्यादी आल्हाद दिगाबंर भांडारकर वय ३६ वर्ष, रा. गुजरी चौक लाखनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४०८,४०९,४६८,४७१,४२०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कुरील पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिविगाळ व मारपीट करुन मोटार सायकलचे नुकसान केले. :-**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी १९.३० ते २०.०० वा. दर. यातील फिर्यादीचा पती हा बाहेरुन घरी आला असता त्याच वेळी यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन घरी येवुन पतीला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन थापडांनी मारपीट केली फिर्यादी व तीची बहीन भांडण सोडविण्यास गेली असता त्यांना सुध्दा अश्लिल शब्दात शिविगाळ करुन थापडाने मारपीट केले व पाहुण घेण्याची धमकी दिली. व मोटार सायकलचे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,२९४,५०६,३२३,४२७,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १३५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तसेच तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व ईतर वाहनांवरती १२० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.